**नियमित दिवाणी दावा क्र. १२६/२०१७.**
**जिभाउ वि. कारभारी**
**नि. ४३ क्रमशः**

**<u>शपथेवर वादीतर्फे साक्षीदार क्र. २</u>**
**माझे नावः** घणशाम देविदास साळवे,
**वयः** ५१ वर्षे, **व्यवसाय –** नौकरी भूकरमापक,
**कार्यरत –** उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, पेठ,
ता. पेठ, जि. नाशिक.

**<u>यांचा पुढील सरतपास श्री. ए. टी. देवरे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

**०१.** मला या प्रकरणात साक्ष समन्स मिळाला आहे. मी सध्या भुमी अभिलेख कार्यालय पेठ येथे भूकरमापक म्हणून कार्यरत आहे. अर्जदार जिभाउ सावळीराम गवारे यांनी उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय चांदवड यांच्याकडे अतितातडी हद्द कायम मोजणी कामी अर्ज केला होता. सदर अर्जावरुन माझ्या कार्यालयात मो. र. क्र. ३४१०/२०१६ प्रमाणे गट क्रं. १२१ मौजे निमोन, ता. चांदवड या गटाची मोजणी करीता मला प्रकरण प्राप्त झाल्यावरुन मी मोजणी दिनांक १८/०३/२०१६ रोजी मोजणीची तारीख निश्चीत केली. मी गटांच्या मालकाला व लगत कब्जेदारांना नोटीस पाठविल्या व त्यानंतर मी दि. १८/०३/२०१६ रोजी गटांची मोजणी केली होती.

**०२.** मला लगत कब्जेदार व गटाच्या मालकाने दाखविलेल्या हद्दी खुणा प्रमाणे मी मोजणी केली. माझ्याकडे मोजणी करीता इ.टी.एस. मशीन, गाव नकाशा, गटस्कीम, चतुःसिमा, सातबारा, फाळणी इ. अभिलेख सोबत होता. मी दिनांक १८/०४/२०१६ रोजी हद्दी खुणा दाखविण्यात येतील याबाबत सर्वांना समज दिली होती. मी त्यानंतर परत सर्वांना नोटीस काढल्या होत्या व त्यानंतर दिनांक १८/०४/२०१६ रोजी हद्दी खुणा कायम करताना माझे असे निदर्शनास आले की, गट क्र. १२१ चे दक्षीणेकडील १.१८ हेक्टर आर क्षेत्र हे गट क्र. १२० च्या कब्जे वहिवाटीत आहे. आता मला मोजणी नकाशाची **'क'** प्रत दाखविण्यात आली. ती प्रत मी आज रोजी माझे सोबत आणलेल्या मोजणी नकाशाच्या **'अ'** प्रतीशी तंतोतंत जुळत असून त्यातील सर्व मजकुर हा मोजणी नकाशाच्या **'अ'** प्रतीप्रमाणेच खरा व बरोबर आहे. सदर मोजणी नकाशाची **'क'** प्रत ही

नि. क्र. ४४ वर आहे. गट क्र. १२१ चे गट क्र. १२० मधील अतिक्रमण हे सदर मोजणी नकाशामध्ये आम्ही अतिक्रमीत क्षेत्र म्हणून गुलाबी रंगात दर्शविले आहे. मला मोजणीच्या वेळी गट क्रं. १२१ च्या दक्षीणेला डाव्या बाजूला कायम खुण वरळी व गट क्रं. १२१ च्या उत्तरेकडे कायम खुण वरळी मिळून आली होती. त्या मी माझ्या सोबत असलेल्या **'अ'** प्रतवर दाखविल्या आहे. **'अ'** प्रतची छायांकित व सत्यापीत प्रत मी आज या प्रकरणात दाखल केली आहे. ती **नि. क्रं. ४७** वर आहे. मोजणी ही इ. टी. एस. मशीनच्या साहाय्याने करण्यात आली आहे.

**सरतपास संपला.**

**प्रतिवादीतर्फे उलटतपास प्रतिवादी गैरहजर, प्रतिवादीच्या विधीज्ञांनी नि. क्र. २९ प्रमाणे प्रतिवादीला रजिष्टर नोटीस पाठवूनही प्रतिवादी स्वतः या प्रकरणात गैरहजर असल्याने कोणताही अर्ज दिला नसल्याने उलटतपास काही नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.के.                श्रवणोत्तर स्वीकृती

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.02.18 15:54:21 +0530

**दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चांदवड.**
**दि. १८/०२/२०२६.**

**(एस. एस. छल्लाणी)**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर,**
**चांदवड.**